गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची
सुधारित नियमावली लागू करण्याबाबत.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव -४२५००१

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
जा.क्र.कबचौउमवि/गुणवत्ता यादी नियमावली/४९४१/२०१८
दिनांक १३ नोव्हेंबर,२०१८

**परिपत्रक क्र. ३४२/२०१८**

वाचा :- (१) विद्यापीठ पत्र जा.क्र.उमवि/७-ह/१२७/२०१३,दि.१२/०१/२०१३
(२) मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळ, ठराव क्र.प.मू.मं.१४/२०१८ दि. १७/१०/२०१८

**प्रस्तावना :**

संदर्भांकित (१) अन्वये गुणवत्ता यादी तयार करण्याबाबतची नियमावली प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु काही अभ्यासक्रमात विद्यापीठांतर्गत शैक्षणिक विभागांमध्ये/महाविद्यालयीन स्तरावर CGPA पध्दत अवलंबविण्यात आलेली आहे, तर काही अभ्यासक्रमात गुणांची टक्केवारी काढून श्रेणी पध्दत लागू आहे. याबाबी संदर्भात विद्यार्थी/महाविद्यालयात संभ्रम निर्माण होत असल्याबाबत विविध महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आहेत. त्या अनुषंगाने गुणवत्ता यादी तयार करतांना येणाऱ्या त्रुटी संदर्भात सकारात्मक मार्ग काढण्याकरीता पुनश्च गुणवत्ता यादी तयार करण्याबाबतची सुधारित नियमावली तयार करण्याची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये समिती गठित करण्यात आली होती.

## विद्यापीठ निर्णय

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये गठित केलेल्या समितीचा अहवाल मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सभेत सादर करण्यात आला असता, ठराव क्र.प.मू.मं.१४/२०१८ दि. १७/१०/२०१८ अन्वये समितीने केलेल्या शिफारशी व गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची सुधारित नियमावली माहे मार्च/एप्रील २०१८ च्या परीक्षापासून लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. :-

**गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची नियमावली :**

१) गुणवत्ता यादी तयार करण्याची ही नियमावली सर्व अभ्यासक्रमांकरिता एकच राहील.

२) गुणवत्ता यादी ही फक्त पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचीच जाहीर केली जाईल.

३) सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतिम वर्षाचे गुणपत्रक दिले जाते, त्या कालावधीतील परीक्षेतील CGPA / गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल.

४) पुनर्परीक्षार्थी / बहि:स्थ दुरस्थ शिक्षण (Distance Education) / श्रेणी सुधार इत्यादी विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही.

५) ज्या विद्यार्थ्याचे नामांकन हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग / प्रशाळेत संबंधित अभ्यासक्रमातील विहीत कालावधीसाठी सलगपणे झालेले असेल, अशा नियमित विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाईल.

६) ज्या अभ्यासक्रमास १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी अंतिम परीक्षेस प्रविष्ठ असतील, त्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमध्ये पाच विद्यार्थ्यांच्या नावाचा समावेश केला जाईल. विद्यार्थी संख्या १५०० पेक्षा कमी असल्यास तीन विद्यार्थ्यांच्या नावाचा समावेश गुणवत्ता यादीत केला जाईल.

७) समान अध्यादेश १ व ४ चा लाभ घेवून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या नावाचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. तसेच जे विद्यार्थी अध्यादेश १६३ चा लाभ घेवून एखादा विषय उत्तीर्ण झालेले असतील अशा विद्यार्थ्यांचा समावेश गुणवत्ता यादीत केला जाणार नाही.
(समान अध्यादेश विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in/examination/user /ordinance. html येथे उपलब्ध आहे.)

८) ज्या अभ्यासक्रमाचे निकाल दिनांक १५ नोव्हेंबर पर्यंत जाहिर झालेले आहेत, त्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

९) CGPA पध्दतीत गुणवत्ता यादी जाहिर करतांना गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या नावासमोर CGPA चा उल्लेख करावा आणि नंतर ग्रेड दर्शवावी.

१०) एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा CGPA सारखा असल्यास त्यांच्या एकूण गुणानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. फक्त अशाच विद्यार्थ्यांचे CGPA बरोबर एकूण गुण गुणवत्ता यादीत दर्शविण्यात येतील.

११) विद्यापीठांतर्गत जे अभ्यासक्रम हे वेगवेगळया CGPA Pattern अंतर्गत विद्यापीठ शैक्षणिक विभाग / प्रशाळेत व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये एकाच शैक्षणिक वर्षात राबविले जात असतील तर अशा अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यास मिळालेल्या गुणांच्या टक्केवारी नुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

१२) तात्पुरती गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) दरवर्षी दि.०१ डिसेंबर पर्यंत जाहीर करण्यात येईल. तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर **आठ** दिवसाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना हरकती घेता येतील. सदर हरकतीचे अर्ज मा.प्राचार्य / मा.संचालक यांनी शहानिशा करुन शिफारस नुसार पाठविणे आवश्यक राहील. तद्नंतर प्राप्त हरकतीवर / विनंती अर्जावर कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

१३) निकाल जाहीर झाल्यानंतर अध्यादेश ४९ व १३४ अन्वये संबंधित विद्यार्थ्यांचे CGPA किंवा गुणात (अभ्यासक्रमाच्या पध्दतीनुसार) वाढ होवून बदल झाल्यास, गुणवत्ता यादी तयार करतांना वाढीव CGPA/ गुण ग्राह्य धरण्यात येईल.

१३) अंतिम गुणवत्ता यादी दरवर्षी दि.३१ डिसेंबर पर्यंत विद्यापीठ संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) प्रसिध्द करण्यात येईल.

१५) ***गुणवत्ता यादी तयार करण्याच्या अनुषंगाने यापूर्वी कळविलेले पत्र जा.क्र.उमवि/७-ह/१२७/२०१३, दि.१२/०१/२०१३ अन्वये निर्गमीत करण्यात आलेले पत्र रद्दबातल समजण्यात यावे.***

१६) गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीची ही नियमावली विद्यापीठ माहे-मार्च/एप्रिल,२०१८ च्या परीक्षेपासून प्रत्यक्ष लागू राहील.

१७) वरील नियमांसंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास, किंवा अपवादात्मक परिस्थितीत त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा.कुलगुरू महोदयांना राहील, आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील.

वरीलप्रमाणे गुणवत्ता यादी तयार करण्यासाठीचे नियम हे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**(भ.प्र.पाटील)**
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगावशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य.
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगावशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक.
३. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव च्या सर्व प्रशाळांचे मा. संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख
४. उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन (अभियांत्रिकी,औषधीनिर्माण व रेकॉर्ड)विभाग,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५. उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन (कला,विज्ञान,शिक्षणशास्त्र व वाणिज्य विद्याशाखा)विभाग ,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
६. प्र.संगणक केंद्र प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
७. परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
८. विद्यापीठाचे प्रशासकीय विभागांचे मा. संचालक/विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव